एक गंमत सांगू तुला ?
लहानपणी चणे फुटाणे खूप आवडायचे खायला
पण दहा पैसेही परवडायचे नाहीत खिशाला
म्हातारपणी रूपयांनी खिसा भरला
पण मोडके दात बघून चणे लागले चिडवायला

एक गंमत सांगू तुला ?
लहानपणी वाटायचे, नवीन पुस्तके हवीत वाचायला
पण मित्रांची पुस्तके उसनी घेवुन अभ्यास पूर्ण केला
म्हातारपणी नवीन पुस्तकांचा ढीग येवून पडला
पण तोपर्यंत चष्म्याचा नंबर 'सोडावॉटर' झाला

एक गंमत सांगू तुला ?
लहानपणी रिक्षातून आवडायचे फिरायला
पण सव्वा रूपयासुध्दा नसायचा कनवटीला
म्हातारपणी ड्रायव्हर म्हणतो गाडी तयार आहे, चला फिरायला
पण जिना उतरेस्तोवर पाय लागतात लटपटायला

एक गंमत सांगू तुला ?
लहानपणी १० X १० ची खोली होती रहायला
दमून भागून आलो की क्षणात लागायचो घोरायला
म्हातारपणी चार खोल्यांचा मोठा ब्लॉक घेतला
पण एकेक खोली आ वासून येते खायला

एक गंमत सांगू तुला ?
खूप शिकून मुलगा अमेरिकेला गेला
फार फार आनंद झाला पण भिती वाटते मनाला
मत्युसमयी येईल का पाणी द्यायला
का ई मेलवर शोकसंदेश पाठवेल आपल्या आईला